# जनसंपर्क अधिकारी

**मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय**

**रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे- ४०११०७**

Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in

**प्रेस नोट ३७६-२०२४** **दिनांक :- १०/१०/२०२४**

## "सप्टेंबर महिन्यामध्ये उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या पोलीस अधिकारी/अंमलदार यांचा मासिक गुन्हे आढावा बैठकीत मा. पोलीस आयुक्त यांचे हस्ते सत्कार"

## सप्टेंबर महिन्यातील उत्कृष्ठ दोषसिद्ध झालेले गुन्हे

➢ **भाईंदर विभाग (बलात्कार सह पोक्सो):-**

**उत्तन सागरी पोलीस स्टेशन गुरनं I १६६/२०२० भा.द.वि.स. कलम ३७६(अे,बी), ३७६(२)एफ,जे,के,आय, ५०६ सह पोक्सो ४,६,८,१० प्रमाणे )**

उत्तन सागरी पोलीस स्टेशन गुरनं I १६६/२०२० भा.द.वि.स. कलम ३७६(अे,बी), ३७६(२)एफ,जे,के,आय, ५०६ सह पोक्सो ४,६,८,१० प्रमाणे दि. २४/०८/२०२० रोजी यातील पिडीत मुलगी वय-९ वर्ष हिचे वडील वय-३२ वर्ष याने दि. २४/०८/२०२० रोजीचे पुर्वी साधारण अंदाजे १२ दिवसापुर्वी भाटेबंदर परिसरात रहाते घरात पिडीत मुलगी ही अल्पवयीन आहे हे माहीती असून सुध्दा तिचेवर वारंवार जबरदस्तीने शरीर संबध ठेवून लैगिक अत्याचार केला व कोणास काही सांगीतले तर चाकुने मारुन टाकीन अशी दमदाटी केली वगैरे मजकूरची फिर्याद दिल्याने उत्तन सागरी गुरनं.I १६६/२०२० दाखल करण्यात आलेला आहे. सदर **गुन्हयाचा तपास श्री. सतिश निकम, सहा. पोलीस निरीक्षक, उत्तन पोलीस ठाणे** यांनी केला आहे. गुन्हयातील आरोपीत यास अटक करुन आरोपीत विरुध्द भक्कम पुरावा गोळा करुन अटक आरोपीविरुध्द विहीत वेळेत मा.न्यायालयात दोषारोपपत्र सादर केले. सदर खटल्याच्या सुनावणीमध्ये मा.न्यायाधिश श्री. डी.एस. देशमुख, सो, जिल्हा सत्र न्यायाधिश व अति. सत्र न्यायाधिश ( पोक्सो ) ठाणे ४ थे न्यायालय ठाणे यांनी वरील **आरोपीत यास २० वर्ष सक्त कारावासाची शिक्षा देण्यात आलेली आहे.**

**सदरची कामगिरी करणारे उत्तन सागरी पोलीस ठाणेचे** :- १) वपोनि.डी.एस.करांडे २) पोनि.श्री. ऋषिकेश पवळ, ३) सपोनि सतिश निकम (सध्या नेम. वाचक सपोनि. पोलीस आयुक्त मिभाववि ) ४) सफौ/संदिप सरुंगळे ( समन्स वांरट अंमलदार ) ५) पो.हवा./दिलीप सनेर ( पैरवी अधिकारी ) ६) पो.हवा/युवराज पाटील ( काशिमीरा पो.ठाणे ) अ.क्र. ३ यांची दिनांक ०९/१०/२०२४ रोजी मासिक गुन्हे आढावा बैठकीमध्ये सप्टेंबर महिन्यातील दोषसिद्ध प्रशस्तीप्रत्र देण्यात येवुन मा. पोलीस आयुक्त, श्री. मधुकर पाण्डेय यांनी सत्कार केला.


of the Month


of the Month

➢ **मिरारोड विभाग (बलात्कार सह पोक्सो) :-**

**( काशिमीरा पोलीस स्टेशन गुरनं I ३०९/२०१६, भा.द.वि.सं. कलम ३७६ (२)(एन),३२८ सह पोक्सो कलम ४, ६ व ८ प्रमाणे )**

काशिमीरा पोलीस स्टेशन गुरनं I ३०९/२०१६, भा.द.वि.सं. कलम ३७६ (२)(एन),३२८ सह पोक्सो कलम ४, ६ व ८ प्रमाणे दिनांक ०२.०५.२०१६ रोजी दाखल आहे. यातील फिर्यादी पिडीत मुलगी ही आरोपीत याची नात्याने सावत्र मुलगी आहे. माहे मार्च २०१६ मध्ये यातील आरोपीत याने फिर्यादीस थंड पेयातून कोणतेतरी गुंगीकारक पदार्थ देवून तिचेसोबत वारंवार जबरदस्तीने जबरी संभोग केला, त्यात ती गरोदर राहील्याने तिचा गर्भपात केला म्हणून गुन्हा दाखल आहे. नमुद गुन्हयाचा प्राथमिक तपास सपोनि गोविंद बोराडे व त्यानंतरचा तपास पोनि धनाजी कळंत्रे यांनी मा.वरिष्ठांचे मार्गदर्शनाखाली केला आहे. यातील आरोपीत नामे अखिलेश वासुदेव चौधरी, रा. दादर यास निष्पन्न करून त्यास अटक करुन, सबळ पुरावे गोळा करुन दोषारोपपत्र मा. ठाणे सत्र न्यायालयात सादर केले होते. त्याचा स्पेशल पोक्सो केस क्रमांक ३३०/२०१६ असा आहे. मा. विशेष सत्र न्यायाधीश सो. (पोक्सो ॲक्ट) ठाणे यांनी दिनांक २६.०९.२०२४ रोजी नमुद **अटक आरोपीत यास १० वर्षे सश्रम कारावास व ५०००/- रुपये दंड, दंड न भरल्यास ०३ महीने साधा कारवास अशी शिक्षा सुनावली आहे.**

**सदरची कामगिरी करणा-या काशिमीरा पोलीस ठाणेचे –** १. वपोनि.राजेंद्र कांबळे, २.पोनि धनाजी कळंत्रे ३.सपोनि गोविंद बोराडे, ४.सफौ श्रीमंत जेधे, सध्या नेम. मध्यवर्ती गुन्हे शाखा, द. अंमलदार ५.पोहवा/०६०३२/ज्ञानेश्वर कांगणे, नेम. नायगाव पोलीस ठाणे. ६.पोशि/१४०५५ साईदास चव्हाण. कोर्ट डयुटी अंमलदार ७.पोशि/१६०१५ अनिल मढवी कोर्ट डयुटी अंमलदार ८. पोहवा/१२०११ सचिन बर्डे समन्स डयुटी अंमलदार यांची दिनांक ०९/१०/२०२४ रोजी मासिक गुन्हे आढावा बैठकीमध्ये सप्टेंबर महिन्यातील दोषसिद्ध क्र. ०१ म्हणुन प्रशस्तीप्रत्र देण्यात येवुन मा. पोलीस आयुक्त, श्री. मधुकर पाण्डेय यांनी सत्कार केला.



➢ **मिरारोड विभाग :-**

**( काशिमीरा पोलीस स्टेशन गुरनं I १४५/२००९ भा.द.वि.सं. कलम ४५४,४५७,३८० प्रमाणे)**

काशिमीरा पोलीस स्टेशन गुरनं I १४५/२००९ भा.द.वि.सं. कलम ४५४,४५७,३८० प्रमाणे नमुद गुन्हयाचा तपास पोउनि सचिन गवस, तत्कालीन नेम. स्था.गु.शा. ठाणे ग्रामीण यांनी केला असून गुन्हा उघडकीस आणुन गुन्हयातील आरोपीतांस अटक करून गुन्हयातील गेला माल २५ मोबाईल फोन ३३,५००/- रु. किं.चे हस्तगत करुन अटक आरोपींविरुध्द मा.प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी सो.ठाणे न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले होते त्याचा केस क्रमांक आर.सी.सी. ८३६/२००९ असा आहे. मा. न्यायालयाने दिनांक ०३.०९.२०२४ रोजी अटक आरोपीत नामे इब्राहीम निसार अन्सारी यास ०६ महीने २७ दिवस साधा कारावास अशी शिक्षा सुनावली आहे.

**सदरची कामगिरी करणारे काशिमीरा पोलीस ठाणेचे** १) वपोनि.राजेंद्र कांबळे २) पोउनि सचिन गवस, तत्कालीन नेम.स्थागुशा,ठाणे ग्रामीण ३) पोहवा.०६०२६ रमेश नारायण गायकवाड, कोर्ट डयुटी अंमलदार४) पोशि/१३०३९ नितिन राठोड. समन्स डयुटी अंमलदार५) पोशि/१४०३१ दिनेश भोर. समन्स डयुटी अंमलदार यांची दिनांक ०९/१०/२०२४ रोजी मासिक गुन्हे आढावा बैठकीमध्ये सप्टेंबर महिन्यातील दोषसिद्ध क्र. ०१ म्हणुन प्रशस्तीप्रत्र देण्यात येवुन मा. पोलीस आयुक्त, श्री. मधुकर पाण्डेय यांनी सत्कार केला.

# सप्टेंबर महिन्यातील गुन्हयांची उत्कृष्ठ उकल

➢ **गुन्हे कक्ष – २ व मध्यवर्ती गुन्हे शाखा (खून) :-**

**(नायगाव पोलीस स्टेशन गुरनं. I ४२२/२०२४ बी.एन.एस.कलम १४०(२), १०३ (१), ३०९(२), २३८ प्रमाणे )**

नायगाव पोलीस स्टेशन गुरनं. ४२२/२०२४ बी.एन.एस.कलम १४०(२), १०३(१),३०९(२), २३८ प्रमाणे यातील मयत ईसम नामे रामचंद्र गुरुमुखदास काकरानी, वय ७५ वर्षे, यास त्याचा चालक मुकेश खुबचंदानी व त्याचे साथिदार यांनी लूटण्याचे उद्देशाने अपहरण करुन रुमालाने गळा आवळून त्यांचा खून करुन मयताचे ताब्यातील रोख रक्कम, हिऱ्याची अंगठी, व महागडे घडयाळ असे चोरी करून पळून गेले होते. नायगाव पोलीस ठाण्याच्या अधिकारक्षेत्रात जबरीचोरी करण्याच्या उद्देशाने वरीष्ठ नागरीकाचे अपहरण करुन खुन केल्याच्या गंभीर गुन्हयाची माहीती प्राप्त होताच युनिट कार्यालयाचे अधिकारी व अंमलदार यांची वेगवेगळी तपास पथके तयार करुन अपहृत व्यक्तीचे मोबाईल मिळालेल्या ठिकाणी तसेच अपहृत व्यक्तीचा मृतदेह मिळालेल्या ठिकाणी भेटी देण्यात आल्या. घटनास्थळाचे बारकाईने निरीक्षण व तांत्रिक तपास करीत असताना मयत इसमाचा चालक मुकेश गोवर्धनदास खुबचंदानी याचे सोबत इसम नामे १) रामलाल व २) अनिल नेपाळी असल्याचे निष्पन्न झाले. गुन्हयातील वाहन चालक आरोपीताचे साथीदार हे भारत-नेपाळ देशांचे सिमावर्ती भागातील रहीवासी असुन ते गुन्हा करुन त्यांचे मुळगावी पळून जाण्याची शक्यता असल्याने मुंबईतुन उत्तरप्रदेश राज्यात जाणा-या मेल गाडयांचे रेल्वे स्टेशन परीसरात तसेच उत्तरप्रदेश राज्यात जाणा-या लग्झरी बसेस स्थानकांचे ठिकाणी वेगवेगळी पथके नेमुन शोध घेण्यात आला. अपहृत व्यक्तीचा मृतदेह मिळालेल्या ठिकाणांचे आजूबाजुस असलेल्या सी सी टी व्ही कॅमेरांचे फुटेजचे परीक्षण करीत असताना आरोपीत हे मुंबई-अहमदाबाद महामार्गावरुन पायी चालत कृष्णा उडपी हॉटेल वसई फाटा येथे गेले व तेथून रिक्षात बसून विरार फाटा येथे उतरले. विरार फाटा येथून गुजरात दिशेने जाणारे खाजगी लग्झरी बसमध्ये बसुन अपोलो हॉटेल, तलासरी या ठिकाणी उतरुन तेथून गुजरात बाजुकडे जात असल्याचे फुटेज प्राप्त झाले. आरोपीत हे उत्तरप्रदेश राज्यातुन नेपाळ देशाची सिमा ओलांडुन जाण्याची शक्यता असल्याने त्याअनुषंगाने तात्काळ वरिष्ठ अधिकारी यांना माहिती देवून संयुक्त पथक तयार करुन त्यांना सुचना देवून तात्काळ सिद्धार्थनगर, उत्तरप्रदेश या ठिकाणी रवाना केले. तपास पथकाने स्थानिक पोलीसांचे मदतीने सिद्धार्थनगर परिसरात आरोपीचा शोध घेतला असता आरोपी हे लूंबीनी, नेपाळ या ठिकाणी पळून गेले असल्याबाबत माहिती प्राप्त झाली. त्याअनुषंगाने गोपनीय बातमीदार तयार करून अतीशय गोपनियरित्या काम करुन माहिती घेतली असता मयताची सोन्याची अंगठी आणि घडयाळ हे

नेपाळ देशात विक्री करीता गेले परंतु त्या महागडया चोरीच्या वस्तूंना कोणी खरेदीदार न मिळाल्याने आरोपीत हे महादेव पूरम कॉलनी, गोरखपूर या ठिकाणी येणार असल्याची माहिती प्राप्त झाली. त्यानुसार सदर ठिकाणी सापळा लावून अतीशय शिताफीने दोन आरोपींना ताब्यात घेण्यात आले. गुन्हयात अटक करण्यात आलेल्या आरोपीतांची नावे :- १) मुकेश गोवर्धनदास खुबचंदानी वय-५८ वर्ष रा. दसेरा ग्राऊंड बॅरेक नं १०२५, सेक्शन २३, उल्हासनगर -३ जवळ, व्ही टी सी उल्हासनगर, जिल्हा- ठाणे राज्य- महाराष्ट्र २) अनिल राजकुमार उर्फ नेपाली मल्लाह उर्फ सहानी उर्फ थापा वय ३२ वर्ष सध्या रा. बोरीवली, मुंबई मुळ रा.- गाव-गिरावजुत, पोलीस ठाणे-पकडी, ता-पकडी, जि-कपिलवस्तू, देश-नेपाळ सदरचा अपहरणासह खुनाचा गुन्हा घडलेपासुन त्याचा निरंतर १८ दिवस कसोशीने तपास करुन गुन्हयातील आरोपीतांची नावे निष्पन्न करुन त्यांचा गुन्हा करुन पळुन जातानाचा माग काढून आरोपीतांच्या वास्तव्य असलेल्या गोरखपुर, उत्तरप्रदेश या बाहेरील राज्यातील ठिकाणावरुन माहीती मिळण्याचा कोणताही दुवा उपलब्ध नसताना गुप्त बातमीदार तयार करुन त्यांना गुन्हयातील मयताचे ताब्यातून चोरुन नेलेल्या १५,१७,०००/- रुपये किंमतीच्या सोन्याची अंगठी, घडयाळ व रोख रक्कमेसह अटक करण्यात आले. आरोपींकडे केले प्राथमिक तपासादरम्यान अटक आरोपी मुकेश गोवर्धनदास खुबचंदानी याने त्याचा साथिदार रामलाल जैनक यादव व अनिल राजकुमार उर्फ नेपाल मल्लाह उर्फ सहानी उर्फ थापा याचेसह उल्हासनगर या ठिकाणीच त्याचे मालक मयत इसम नामे रामचंद्र काकरानी यांना लुटण्याचा प्लान केला होता. परंतु तो यशस्वी झाला नाही. त्यांनतर आरोपी मुकेश गोवर्धनदास खुबचंदानी हा मालकासह पेट्रोलपंपाचे पैसे जमा करण्यासाठी विरार या ठिकाणी आला व परत उल्हासनगर या ठिकाणी निघाले असता चालक मुकेश गोवर्धनदास खुबचंदानी याने रामलाल जैनक यादव व अनिल राजकुमार उर्फ नेपाल मल्लाह उर्फ सहानी उर्फ थापा यांना पारोळे, भिवंडी या येथे ठिकाणी बोलावून घेतले. सदर ठिकाणी गाडी आली असता आधीच ठरल्या ठिकाणी गाडी थांबवून रामलाल जैनक यादव व अनिल राजकुमार उर्फ नेपाल मल्लाह उर्फ सहानी उर्फ थापा यांना गाडीत बसवून गाडी पुन्हा विरारच्या दिशेने वळवीली व आपले साथिदार यांचे मदतीने मालक रामचंद्र काकरानी यांचा रुमालाने गळा आवळला परंतु त्यांचा श्वास चालू असल्याने त्यांनी गाडी पुढे नेली. गाडी घटनास्थळी आलेनंतर मयत याचा मृत्यू झाल्याची खात्री झाल्यावर त्याचे ताब्यातील रोख १,४८,०००/- रुपये, १५ लाख रुपयाचा अंगठी व घडयाळ असा मुद्देमाल चोरी करून मयत व गाडी तेथेचे सोडून मिळेल त्या वाहनाने सिद्धार्थनगर मार्गे नेपाळ या ठिकाणी पळून गेले असल्याचे सांगीतले आहे. यातील तिसरा आरोपी रामलाल जैनक यादव याचा शोध चालू असून अटक आरोपी व मुद्देमाल पुढील तपासकामी नायगाव पोलीसांचे ताब्यात देण्यात आले आहे.अटक करण्यात आलेल्या आरोपीत मुकेश गोवर्धनदास खुबचंदानी याची गुन्हेगारी पार्श्वभुमी

| क्र | पोलीस ठाणे | गुन्हा रजि नंबर व कलम |
|---|---|---|
| १) | सेंट्रल पोलीस ठाणे, उल्हासनगर | १७२/२०२३ भादविस कलम ३९४,३४ प्रमाणे |
| २) | अनपुरणा पोलीस ठाणे, ईंदोर | ४५०/२०२१ भादविस कलम ३९४,४५०,३४ प्रमाणे |
| ३) | निजामपुर पोलीस ठाणे, भिवंडी | ११/२०१५ भादविसक, ४३९,३२८,२७२,२७३, १८८,३४ प्रमाणे |
| ४) | जगदिशपुर पोलीस ठाणे, आग्रा | ८३७/२०१५ भादविस कलम ३७९ प्रमाणे |
| ५) | सेंट्रल रेल्वे पोलीस ठाणे, मुंबई | ८४९/२०१४ भादविस कलम ४०६,४२० प्रमाणे |
| ६) | बोरीवली रेल्वे पोलीस ठाणे | ५४७/२०१२ कॉन्ट्रक्ट लेबर ॲक्ट कायदा ५०५,१,बी,३४२,१८२,४२७,५०७,१५३ प्रमाणे |

**सदरची कामगिरी करणारे गुन्हे कक्ष २ व मध्यवर्ती गुन्हे शाखा चे** १) सपोआ मदन बल्लाळ (गुन्हे) २) पोनि. शाहुराज रणवरे ३) पोनि राहुल राख ४) सपोनिरी/ सुहास कांबळे ५) सपोनि नितीन बेंद्रे ६) सपोनि नितीन बेंद्रे ७)पोहवा/०३०७६ प्रफुल्ल पाटील ८) पोहवा/०६१०७ रमेश आलदर ९) पो.हवा/ १२०९७ अमोल कोरे १०) पोना/ ०३०३२ प्रशांतकुमार ठाकूर कक्ष-२ ११) पोहवा/हनुमंत सुर्यवंशी १२) पोहवा/राजविर संधु १३) पोशि/साकेत माघाडे मध्यवर्ती गुन्हे शाखा १४) पो.शि/२३१३३ पांडुरंग महाले, १५) पोशि/१६०१२ सचिन खताळ, नायगाव

पोलीस ठाणे यांचा दिनांक ०९/१०/२०२४ रोजी मासिक गुन्हे आढावा बैठकीमध्ये **"सप्टेंबर महिन्यातील गुन्हयांची उकृष्ठ उकल"** क्र. १ म्हणुन प्रशस्तीप्रत्र देण्यात येवुन मा. पोलीस आयुक्त, श्री. मधुकर पाण्डेय यांनी सत्कार केला.





➢ **गुन्हे शाखा, कक्ष - ३ (खून) :-**

**( पेल्हार पोलीस स्टेशन गुरनं I ६६६/२०२४ बी.एन.एस.कलम १०३ (१) प्रमाणे )**

पेल्हार पोलीस स्टेशन गुरनं ६६६/२०२४ बी.एन.एस.कलम १०३ (१) प्रमाणे दि. २४/०८/२०२४ रोजी सकाळी ०९.५० वाचे पुर्वी जोगेंद्र यादव चाळ, घरतवाडी, श्रीरामनगर, नालासोपारा पूर्व ता.वसई जि.पालघर येथे फिर्यादी नामे - श्री दिपनारायण गोविंद बिंद यांचा त्यांचा भाऊ नामे - प्रमोदकुमार गोविंद बिंद याचेशी संपर्क होत नसल्याने फिर्यादी यांना प्रमोदकुमार गोविंद बिंद यांचे राहते घरी जाऊन खिडकीतुन आत पाहीले असता त्यांना प्रमोदकुमार ऊर्फ कतवारु गोविंद बिंद हा रक्ताच्या थारोळयात पडलेला दिसला त्यावेळी त्यांनी मयत याचे घराचे दरवाज्याला लावलेले कुलूप तोडून आत प्रवेश केला असता त्यांना त्यांच्या भावाचे गळ्यावर अज्ञात व्यक्तीने अज्ञात कारणावरुन धारधार शस्त्राने वार करून त्यांचा खुन केल्याचे दिसुन आले म्हणुन पेल्हार पोलीस ठाणे गुन्हा रजि नंबर ६६६/२०२४ भारतीय न्याय संहीता १०३ (१) प्रमाणे गुन्हा नोंद आहे. मा. वरिष्ठांनी सदर खुनाच्या गुन्हयातील अज्ञात

आरोपीत यांचा शोध घेणे बाबत दिलेल्या सुचना व आदेशान्वये गुन्हयाचा समांतर गुन्हे शाखा कक्ष -३ व्दारे करीत असतांना गुन्हयातील मयत प्रमोदकुमार गोविंद बिंद यांचे हाता खाली काम करणारे १२ ते १५ बांधकाम काम करणारे मजुर/ कारागीर यांचेकडे तपास केला मयत प्रमोदकुमार गोविंद बिंद याचे प्राप्त मोबाईल क्रमांक ९१७२२७२४८५ चे तांत्रीक विश्लेषण करीत असतांना नमुद क्रमांक व्दारे दिनांक २३/०८/२०२४ रोजी २२:४७:३० वाजता मोबाईल क्रमांक ९०२८४००३६४ चा धारक कमलेश राजा बिंद यास फोन केला असल्याचे निष्पन्न झाल्याने इसम नामे - कमलेश राजा बिंद याचे कडे कौशल्यपुर्वक चौकशी व तपास केला असता मयत यांने फोनव्दारे कमलेश यास समिर ऊर्फ समशेर हा नालासोपारा येथे आला आहे अगर कसे याबाबत विचारणा केल्याची माहिती प्राप्त झाल्याने समिर ऊर्फ समशेर यांचा मो. क्र. ९७९३६२६५८१ प्राप्त केला व त्यांचे सि.डी.आर.चे तांत्रीक विश्लेषण केले असता सदर मोबाईल क्रमांक दिनांक २२/०८/२०२४ रोजी ०८.१८ वाजता सुरत राज्य गुजरात येथे बंद झाला असल्याचे निष्पन्न झाले.त्यानंतर समिर ऊर्फ समशेर याचा फोटो प्राप्त करुन घटनास्थाळाच्या आजुबाजुचे सि.सि.टी.व्ही.फुटेज व विरार पासुन ते दादर रेल्वे स्टेशनचे सि.सि.टी.व्ही. फुटेजची तपासणी केली असता दिनांक २४/०८/२०२४ रोजी सायंकाळी १५.३० वाजता समिर ऊर्फ समशेर हा बांद्रा रेल्वे स्टेशन येथे दिसुन आल्याने त्यांचा तांत्रीक विश्लेषण व प्राप्त गोपणीय बातमीवरुन आरोपीत नामे समिरकुमार ऊर्फ समशेर हा जिल्हा वाराणसी, उत्तरप्रदेश येथे असल्याची खात्रीशिर बातमी मिळाल्याने समिरकुमार ऊर्फ समशेर बच्चालाल बिंद वय २३ वर्षे, रा. वाराणसी उत्तरप्रदेश येथुन ताब्यात घेण्यात आले असुन त्याचे कडे कौशल्यपुर्वक गुन्हे अनुषंगाने विचारपुस केली असता आरोपीत याने पैसे जबरी चोरी करण्याच्या उद्देशातुन इसम नामे- प्रमोदकुमार उुर्फ कतवारु गोविंद बिद वय-५१ वर्षे याचा खुन केल्याचे निष्पन्न झाल्याने त्यास पुढील कारवाई करीता दिनांक ०३/०९/२०२४ रोजी पेल्हार पोलीस ठाणे येथे हजर करण्यात आले आहे.

**सदरची कामगिरी करणारे गुन्हे शाखा, ३ चे -** १) पो.नि/ प्रमोद बडाख, २) सपोनि/ सोपान पाटील ३) पोउपनिरी/उमेश भागवत, ४) सफौ/ अशोक पाटील, ५) पो.हवा/०५०३८ मनोज चव्हाण ६) पो.हवा/०६११५ सचिन घेरे, ७) पो.हवा/ ०६१०३ मुकेश तटकरे ८) पोहवा/०७०९३ सागर बारावकर, ९) पो.हवा/ १२०४५ अश्विन पाटील १०) पो.अं./०७१४९ राकेश पवार, ११) पो.अं./१३१३७ सुमित जाधव, १२) पो.अं./१३०६१ सुनिल पाटील १३) पो.अं./१३०९५ युवराज वाघमोडे १४) पो.अं/ २३३१९ अतिश पवार १५) पो.अं/ २३३४८ तुशार दळवी १६) पो.अं./ २३३४९ मनोहर तराडे १७) मसुब/ सागर सोनावणे, १८) मसुब/ प्रविण वानखेडे, १९) मसुब / गणेश यादव सर्व नेम - गुन्हे शाखा कक्ष -३ २०)सफौ/ संतोष चव्हण नेम - सायबर सेल यांचा दिनांक ०९/१०/२०२४ रोजी मासिक गुन्हे आढावा बैठकीमध्ये **"सप्टेंबर महिन्यातील गुन्हयांची उकृष्ठ उकल"** म्हणुन प्रशस्तीप्रत्र देण्यात येवुन मा. पोलीस आयुक्त, श्री. मधुकर पाण्डेय यांनी सत्कार केला.



➢ **मिरारोड विभाग (घरफोडी ) :-**

**(काशिगाव पोलीस ठाणे गुरनं I ३०२/२०२४ भारतीय न्याय सहिंता २०२३ चे कलम ३०५,३३१(४),६१(ब) प्रमाणे.)**

काशिगाव पोलीस ठाणे गुरनं ३०२/२०२४ भारतीय न्याय सहिंता २०२३ चे कलम.३०५,३३१(४),६१(ब) प्रमाणे. यातील फिर्यादी श्री. कपिल प्रमोदकुमार शुक्ला, वय ३४ वर्षे, व्यवसाय- डॉक्टर, रा. रुम नं ओ/६०२, जेपी डेक्स, गोकूळधाम सोसायटीच्या बाजुला, गोरेगाव पुर्व, मुंबई यांच्या मालकीचे असलेले श्रीमती राधा हॉस्पीटल, विनयनगर, मिरारोड पूर्व, ता.जि. ठाणे येथे दिनांक १९/०९/२०२४ रोजी ११.०० ते दिनांक २१/०९/२०२४ रोजी १०.३० वाजताचे दरम्यान कोणत्यातरी अज्ञात इसमाने काळया रंगाचा बुरखा परीधान करुन त्यांच्या केबिन मध्ये प्रवेश करुन त्यांच्या हॉस्पीटलचे लॉकरमधील रोख रक्कम रू. २१,००,०००/- स्वतःचे आर्थिक फायदयाकरीता चोरी केली म्हणून अज्ञात इसमाविरूद्ध तक्रार दिल्यावरुन सदरचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गुन्ह्यात आरोपी नांमे १)मनिषकुमार जयश्याम मिश्रा,पत्ता प्रतापगड,राज्य उत्तर प्रदेश २) विरेंद्र भारत पुरी वय ३४ वर्षे रा.हनुमान चाळ,घोडबंदर शिफ्टींग,काशिगाव मिरारोड (पु) ता.जि. ठाणे मुळ पत्ता-प्रतापगड,राज्या उत्तर प्रदेश ३) सोनु अल्लाउद्दुन शेख,वय २८ वर्षे,पत्ता- सिंहीगांव, जिल्हा कटीहार,राज्य बिहार यांना दिनांक २४.०९.२०२४ रोजी अटक करण्यात आली असुन अटक आरोपीतांकडुन नमुद गुन्ह्यातील फिर्यादी यांच्या हॉस्पीटलमधुन चोरी केलेल्या रक्कमे पैकी एकुण १८,००,०००/रु रोख रक्कम (अक्षरी- अठरा लाख रुपये) तसेच गुन्ह्यात वापरलेली ऑटो रिक्क्षा,आरोपीताने परिधान केलेला बुरका व घरफोडीचे साहित्य इत्यादी त्यांच्याकडुन हस्तगत करण्यात आले आहे.

**सदरची कामगिरी करणारे काशिगाव पोलीस ठाणेचे -** १. वपोनि.श्री. राहुलकुमार पाटील २.पोउनि. अभिजीत लांडे ३.पोउनि. किरण बघडाणे ४.पो.हवा. ०८००१/प्रताप पाचुंदे ५.पो.शि. १३११६/किरण विरकर ६.पो.शि. १६०९०/उमंग चौधरी ७.पो.शि. १६०२१/विक्रांत खंदारे ८.पो.शि. १५०१५/प्रविण टोबरे ९.पो.शि. १४०५३/नामदेव देवकाते १०.पो.शि. २३९३९/रविंद्र सोनावणे ११.पो.शि. २३०६८/अभिषेक मडावी यांचा दिनांक ०९/१०/२०२४ रोजी मासिक गुन्हे आढावा बैठकीमध्ये **"सप्टेंबर महिन्यातील गुन्हयांची उकृष्ठ उकल"** म्हणुन प्रशस्तीप्रत्र देण्यात येवुन मा. पोलीस आयुक्त, श्री. मधुकर पाण्डेय यांनी सत्कार केला.



➢ **मिरारोड विभाग (फसवणूक) :-**

**(मिरारोड पोलीस स्टेशन गुरनं. I ३७८/२०२३ भादंवि कलम ४२०,३४ सह आयटी ॲक्ट ६६(डी) प्रमाणे )**

मिरारोड पोलीस स्टेशन गुरनं.३७८/२०२३ भादंवि कलम ४२०,३४ सह आयटी ॲक्ट ६६(डी) प्रमाणे फिर्यादी नामे श्री. राहुल प्यारेलाल सेठ रा. मिरारोड सप्टेंबर २०२३ ते नोव्हेंबर २०२३ या कालावधीमध्ये आर्क ट्रेडर्स कंपनीचे १. राम उपाध्याय मो.नं. ७७०५८७०६४६ २) राज यादव मो.क्र.-७४४११२५७५९ ३) संजय मेहता मो.नं.

९६५१८४६५७४ असे स्वत:चे नाव सांगून वेळोवेळी फिर्यादी यांचेशी व्हॉटसअपद्वारे संपर्क साधला. तसेच फिर्यादी यांचे आयसीआयसीआय बँक खात्या मधून त्यांचे एचडीएफसी व ॲक्सीस बँक खात्यांमध्ये ७१,७५,६४२/- रु ट्रेडींगच्या नावाने स्विकारून फसवणुक केली. सदरबाबत मिरारोड पोलीस ठाण येथे I ३७८/२०२३ भादंवि कलम ४२०,३४ सह आयटी ॲक्ट ६६(डी) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. सायबर पोलीस ठाणे येथे गुन्हयांचे तपासाचे अनुषंगाने फिर्यादी यांचे बँक खात्यामधून ज्या बँक खात्यांमध्ये वर्ग बाबत माहिती प्राप्त करण्यात आली.सदर बँक खात्यामध्ये जमा झालेली रक्कम ग्वालीयर, छत्रपुर राज्य मध्यप्रदेश येथून एटीएम विड्रॉल होत असल्याबाबत तपासामध्ये दिसून आले.त्क्क़क्ष एड्ढदत्त बँक खात्याचे प्राप्त माहितीचे अवलोकन केले असता संशयीत आरोपीत नामे मोहम्मद मुवाज मेहराज हा खातेधारक असल्याची माहिती प्राप्त करण्यात आली. गुन्ह्यातील बँक खात्याचे विश्लेषणावरून प्राप्त माहितीचे अनुषंगाने सायबर पोलीस ठाणेचे पोलीस निरीक्षक सुजितकुमार गुंजकर यांचे मार्गदर्शनाखाली पथक पोउपनि प्रसाद शेनोलकर, पो.शि. ओंकार डोंगरे, पो.शि. ज्ञानदीप पाटील यांनी आरोपीताचा भोपाळ, मध्यप्रदेश येथे जावुन शोध घेतला व आरोपीतास अटक केले आहे. अटक आरोपीताकडे गुन्ह्याच्या अनुषंगाने कसून तपास करण्यात आला, तसेच आरोपीकडून प्राप्त माहितीव्दारे फिर्यादी यांची रक्कम वेगवेगळ्या बँक खात्यामध्ये जमा करण्यात आल्याची माहिती प्राप्त करण्यात आली. सदर तपासामध्ये फिर्यादी यांना सविस्तर माहिती देवून कलम ४५७ फौदंप्रसं अन्वये मा. न्यायालयामध्ये गुन्ह्यातील रक्कम परत मिळविण्याबाबत माहिती देण्यात आली.मा.न्यायालयाकडून कलम ४५७ फौदंप्रसं अन्वये आदेश प्राप्त करून त्याबाबत संबंधित बँकाकडे सतत ०३ महीने पाठपुरावा करून फिर्यादी यांची फसवणूक झालेल्या रक्कमपैकी ५३,३१,३३८/- रु ( त्रेपन्न लाख, एकतीस हजार, तिनशे अळोतीस रूपये) परत मिळविण्यात आलेली आहे.सायबर फसवणूकीतील गुन्हा उघडकीस आणून सायबर पोलीस ठाणे यांनी कौशल्यपुर्ण तपास करून गुन्ह्यातील फसवणूक झालेल्या रक्कमपैकी ५३,३१,३३८/- रु रक्कम फिर्यादी यांना परत मिळवून दिलेली आहे.

**सदरची कामगिरी करणारे सायबर पोलीस ठाण्याचे** १) पोनि/ सुजितकुमार गुंजकर २) सपोनि/ स्वप्नील वाव्हळ ३) पोउनि/प्रसाद शेनोळकर ४) सफौ/मिलाग्रिस फर्नांडिस ५) मपोहवा/१२००७ माधुरी धिंडे ६) मपोअं/१३१०४ पल्लवी निकम ७) मपोअं/१६१०६ सुवर्णा माळी ८) पोअं/१७०५३ शुभम कांबळे ९) पोअं/२२००३ कुणाल सावळे १०) मपोअं/२३६३९ स्नेहल पुणे ११) पोअं/ २३३२१ राहुल बन १२) पोअं/२३०५७विलास खाटीक १३) पोअं/२३८३३सावन शेवाळे १४) पोअं/२२०४० प्रशांत बोरकर १५) पोअं/ज्ञानदिप पाटील (नेम- आगुशा मि.भा.व.वि) यांचा दिनांक ०९/१०/२०२४ रोजी मासिक गुन्हे आढावा बैठकीमध्ये **"सप्टेंबर महिन्यातील गुन्हयांची उकृष्ठ उकल"** म्हणुन प्रशस्तीप्रत्र देण्यात येवुन मा. पोलीस आयुक्त, श्री. मधुकर पाण्डेय यांनी सत्कार केला.



➢ **गुन्हे शाखा, कक्ष - १ (जबरी चोरी) :-**

**( मिरारोड पोलीस स्टेशन गुरनं. । २७२/२०२४ बी.एन.एस.कलम ३०९ (४), ३(५) प्रमाणे.)**

मिरारोड पोलीस स्टेशन गुरनं. । २७२/२०२४ बी.एन.एस.कलम ३०९(४),३(५) प्रमाणे दिनांक २७/०८/२०२४ वा २१.०० वा. चे सु. ए विंग, बिल्डींग नं.०६, ग्रीनपार्क सोसायटी, मिरारोड (पू), जि. ठाणे येथे फिर्यादी अर्चना शशिकांत मयेकर, वय - ७२ वर्षे, व्यवसाय - गृहिणी, यांची ९०,०००/- रुपये किमतीची २० ग्रॅम वजनाची सोन्याची चैन व १.५ ग्रॅम वजनाचे सोन्याचे पेंडाल असे एकुण २१.५ ग्रॅम वजनाचे जु.वा.किं.सु. स्कुटी गाडीवरील दोन इसमांनी आपसात संगणमत करुन जबरीने खेचुन चोरुन नेले बाबत दिल्या फिर्यादी वरुन मिरारोड पोलीस ठाणे गु.नों.र.क्र. २७२/२०२४ गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गुन्हयाचा समांतर तपास गुन्हे शाखा-१, काशिमीरा मार्फत करीत असतांना, घटनास्थळावरील मिळालेले सि.सि.टी.व्ही फुटेज, तांत्रिक विष्लेषन व बातमीदारांकडुन मिळालेल्या माहीतीवरुन सदर गुन्हा हा आरोपीत नामे राहुल रवी शर्मा वय- ३१ वर्षे रा.घर नं. ७६, स्वर्ग रेसीडंन्सी,सायन ओलपाड रोड, भटोदरा गाव, सुरत राज्य- गुजरात याने केल्याचे निष्पंन्न झाल्याने गुन्हे शाखा कक्ष -१, काशिमिरा येथील पोलीस पथक सुरत, गुजरात येथे जावुन नमुद आरोपीस त्याच्या राहते घरातुन दि. ३१/०८/२०२४ रोजी ताब्यात घेण्यात आले असुन त्याचेकडे सदर गुन्हयाबाबत चौकशी करता सदरचा गुन्हा हा त्याने त्याचा मित्र विवेक उर्फ बिल्ला राजपुत याचे सोबत मिळुन केला असल्याचे कबुल केले आहे. तरी आरोपीत नामे राहुल रवी शर्मा यास रिपोर्ट सोबत काशिमीरा पोलीस ठाण्यात हजर करण्यात आले आहे.

**सदरची कामगिरी करणारे गुन्हे कक्ष-०१ चे -** १) पोनिरी अविराज कुराडे २) पो.उप-निरी. निखील चव्हाण ३) पो.हवा. पुष्पेंद्र थापा ४) पो.हवा. विकास राजपुत ५) पो.हवा. सचिन हुले ६) पो.शि. गौरव बारी यांचा दिनांक ०९/१०/२०२४ रोजी मासिक गुन्हे आढावा बैठकीमध्ये **"सप्टेंबर महिन्यातील गुन्हयांची उकृष्ठ उकल"** म्हणुन प्रशस्तीप्रत्र देण्यात येवुन मा. पोलीस आयुक्त, श्री. मधुकर पाण्डेय यांनी सत्कार केला.



➢ **वसई विभाग (दरोडा) :-**

**(माणिकपुर पोलीस स्टेशन गुन्हा रजि नं I २८८/२०२४ भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम ३१० (२), ३११,३०९ (६),३५१ (२),३ (५) सह आर्म ॲक्ट ३,४,२५ प्रमाणे)**

माणिकपुर पोलीस स्टेशन गुन्हा रजि नं I २८८/२०२४ भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम ३१० (२), ३११, ३०९ (६), ३५१ (२), ३ (५) सह आर्म ॲक्ट ३, ४, २५ प्रमाणे फिर्यादी नामे सिद्धराज कर्शन राजपूत, वय २२ वर्षे, धंदा-कुरियर सेवा, हे त्यांचे ऑफिसमध्ये दैनंदिन कामकाज करता असतांना पाच अनोळखी इसमांनी येवुन त्यापैकी एक इसमाने बॅगमधुन पिस्टलसारखे हत्यार बाहेर काढुन तक्रारदार यांचे डोक्याला लावुन, चिल्लाया तो तेरेको ठोक डालेगा, तेरे पास पैसा वैसा है, सब बाहर निकाल तसेच दुसऱ्या इसमाने बॅगमधील मोठा चॉपर बाहेर काढुन तक्रारदार यांचे मानेला लावुन ऑफिसमधील ड्रॉव्हरमध्ये ठेवलेल्या रकमेची शोधाशोध सुरु करुन फिर्यादी यांचे हात पाय बांधुन व जीवे मारण्याची धमकी देऊन एकुण रु ७३,७००/- रकमेचे दोन मोबाईल, रोख रक्कम व डीव्हीआर जबरी चोरी करुन पळुण गेलेबाबत गुन्हा नोंद करण्यात आला आहे. सदर गुन्हयाचे गांभीर्य लक्षात घेवुन आरोपीत याचा शोध घेणेकामी माणिकपुर गुन्हे प्रकटीकरण शाखेचे अधिकारी व अंमलदार तात्काळ घटनास्थळी भेट देवुन घटनास्थळावरुन मिळालेल्या माहितीच्या आधारे तसेच सुमारे १०० हुन अधिक ठिकाणचे सी.सी.टी.व्ही कॅमेरे तपासुन व तांत्रिक विश्लेषणाचे आधारे आरोपीत हे संतोषभुवन, नालासोपारा पुर्व परिसरात राहत असल्याची माहिती प्राप्त झाल्याने साफळा रचुन आरोपीत नामे १) अजय बलराम मंडल, वय ३७ वर्षे, सध्या २) शंकर मंजु गौडा, वय ५० वर्षे, सध्या ३) विजय सुरेश सिंग, वय ५५ वर्षे, सध्या रा. यांना ताब्यात घेवुन अटक करण्यात आली असुन सदर आरोपीत यांचेकडे कौशल्याने विचारपुस करुन त्यांचे इतर दोन साथीदार आरोपीत नामे ४) मोहम्मद जुबेर नुरमोहम्मद शेख, वय ३२ वर्षे, ५) लालमणी दोरिकामहतो यादव, वय ३६ वर्षे, यांना ताब्यात घेवुन अटक करण्यात आली आहे. सदर सराईत आरोपीत यांचे टोळीकडुन एकुण रु. ३,१४,८००/- किंमतीचे ॲटोमॅटिक पिस्टल, ०८ जिवंत काडतुस, इको कार, चॉपर, चाकु, कटर मशिन, हॅण्डल बार त्याचे शॉकेट, पाने, स्क्रु ड्राईव्हर, पक्कड, कटर, हातोडी, चाव्या, मोबाईल फोन इ. साहित्य निवेदन/मेमोरंडम पंचनाम्याने जप्त करण्यात आले आहे. तसेच सदर गुन्हयातील आरोपी क्र. ०२ याचेविरुध्द वेगवेगळया पोलीस ठाण्यामध्ये १० गुन्हे दाखल आहे. आरोपी क्र. ०१ व ०३ यांचेविरुध्द वेगवेगळया पोलीस ठाण्यामध्ये ०६ गुन्हे दाखल आहे. अटक आरोपीत यांचेकडुन उघडकीस आणलेले गुन्हे खालीलप्रमाणे

| अ.क्र. | पोलीस ठाणे | गु.र.क्र. व कलम |
|---|---|---|
| १. | नालासोपारा पोलीस ठाणे | गु.र.क्र. २०३/२०२४ कलम ३८०,४५४,४५७,३४ भा.दं.वि. |
| २. | कोळसेवाडी पोलीस ठाणे, कल्याण पुर्व | गु.र.क्र. ७८८/२०२४ कलम ३०३ (२) भा.न्या.सं. |
| ३. | कुर्ला रेल्वे पोलीस ठाणे, मुंबई | गु.र.क्र. १७८३/२०२४ कलम ३७९ भा.दं.वि. |
| ४. | दावनगेरे पोलीस ठाणे, कर्नाटक | गु.र.क्र. १३४/२०२४ कलम ३७९ भा.दं.वि. |

**सदरची कामगिरी करणारे माणिाकपुर पोलीस ठाणेचे.** १) वपोनि राजु माने, २) पोनि संतोष चौधरी (गुन्हे), ३) पो.उ.नि. सनिल पाटील,४) पो.उ.नि. सागर साबळे ५) पो.ह.०२०१२/शैलेश पाटील, ६)पो.ह.०७०४१/शामेश चंदनशिवे, ७) पो.ह.०७०२८/धनंजय चौधरी, ८) पो.शि. १७०२६/प्रविण कांदे, ९) पो.शि.१६०५०/गोविंद लवटे, १०) पो.शि. १६१२९/आनंदा गडदे ११) म.पो.शि./पुजा कांबळे यांचा दिनांक ०९/१०/२०२४ रोजी मासिक गुन्हे आढावा बैठकीमध्ये **"सप्टेंबर महिन्यातील गुन्हयांची उकृष्ठ उकल"** म्हणुन प्रशस्तीप्रत्र देण्यात येवुन मा. पोलीस आयुक्त, श्री. मधुकर पाण्डेय यांनी सत्कार केला.


Best Detection - 6